Dr.Reddy's

# केसांच्या गळण्याबद्दल जागरूकतेचा महिना



## केसांचे गळणे सामान्य असते का?[1]

रोज 50–100 केसांचे गळणे सामान्य असते. पण, सामान्यापेक्षा जर तुमचे केस जास्त गळत असतील, तर तुम्ही केसांच्या गळण्याने त्रस्त आहात (याला ॲलोपेसिया असे देखील म्हणतात).



## केसांच्या गळण्याचा तुमच्यावर परिणाम झाला आहे काय?[2]

केसांच्या गळण्याची समस्या कोणालाही होऊ शकते. याचा सर्व वयाच्या महिला आणि पुरुषांवर परिणाम होतो.

## केस गळण्याची लक्षणे कोणती आहेत?[1]

- डोक्याच्या शीर्षभागी केस पातळ होऊ लागणे
- अचानक केस सैल होऊ लागणे
- गोलाकार किंवा चट्टेयुक्त टकलेचे स्पॉटस
- टाळूवर खपल्यांचे चट्टे पसरू लागणे
- संपूर्ण शरीरावरील केस गळणे

## केसांच्या गळण्याचे विविध प्रकार का असतात?[3]

**इन्व्होल्युशनल ॲलोपेसिया**
एक नैसर्गिक स्थिती, ज्यात केस वयाबरोबर हळूहळू गळतात.

**ॲंड्रोजेनिक ॲलोपेसिया**
एक अनुवांशिक स्थिती जी पुरुष (पुरुषांचा टकलेचा प्रकार) आणि महिला (महिलांचा टकलेचा प्रकार) दोघांना प्रभावित करते.

**ॲलोपेसिया अरियाटा**
हे अचानक सुरु होते आणि मुले आणि तरुण प्रौढांमध्ये चट्ट्यामंध्ये केस गळू लागतात.

**ॲलोपेसिया युनिव्हर्सलीस**
यामुळे शरीरावरील सर्व केस गळतात, ज्यात भुवया, पापणीचे केस आणि जननेंद्रियांवरील केस देखील सामील असतात.

**टेलोजेन एफ्लूवियम**
केसांच्या गळण्याचा तात्पुरता कालावधी, जो केसांच्या वाढीच्या चक्रासोबत बदलतो.

**स्कारिंग ॲलोपेसिया**
हे एक कायमस्वरूपी केसांचे गळणे आहे, जे त्वचेवर आग होणे आणि त्वचेच्या इतर विकारांमुळे स्थितीमुळे उद्भवते.

## केसांचे गळणे कशामुळे होते?[3,4]

- हार्मोनचे असंतुलन
- जीन्स
- तणाव
- बाळाला जन्म देणे
- औषधे (कॅन्सरवरील उपचार)
- आजार / वैद्यकीय स्थिती
- टाळूचा सोरॅसिस
- विटामिन बी, आयर्न, प्रोटीन आणि झिंक यांची कमतरता
- बकेसांवरील उपचार / उत्पादने



## डॉक्टरांची भेट कधी घ्यायची?[1]

तुमच्या डॉक्टरांची भेट घ्या, जर:

- तुमच्या किंवा तुमच्या मुलाच्या निरंतर केसांच्या गळण्याने तुम्ही तणावग्रस्त असाल आणि तुम्हाला उपचार चालू करायचा असेल.
- केशरेखा कमी होण्याचा तुम्हाला अनुभव येत असेल (फ्रंटल फायब्रोसिंग ॲलोपेसिया)
- तुम्हाला तुमचे किंवा तुमच्या मुलाचे / मुलीचे केस विंचरताना अचानक किंवा चट्टेयुक्त केसांची हानी किंवा नेहमीपेक्षा जास्त केस गळण्याचा अनुभव आल्यास.

## केस गळण्यावर कोणताही उपचार आहे का?[2,5,6]

अशी काही औषधे (जसे मिनोक्सिडील, फिनास्टेराइड) आहेत, जी तुमच्या केसांचे गळणे कमी करू शकतील आणि अंशिक पुनर्वाढीला चालना देऊ शकतील. डॉक्टर देखील काही उपचार सुचवू शकतात, जसे:



केसांचे प्रतिरोपण



लेझर उपचारपद्धती



माइक्रोनीडलिंग



प्लेटलेट रिच प्लाज्मा (पीआरपी) उपचारपद्धती

## केसांची योग्य स्वच्छता राखा

- प्रत्येक शाम्पूनंतर कंडिशनर वापरा[7]
- टाळू स्वच्छ करण्यावर भर द्या[7]
- तेलकट केस वरचेवर धुवा[7]
- सौम्य शाम्पू वापरा[8]
- तुमचे केस लवकर कोरडे होण्यासाठी त्यांना एका मायक्रोफायबर टॉवेलमध्ये गुंडाळा[8]

## केसांची योग्य स्वच्छता राखा

- केसांचे उन आणि अल्ट्रावायोलेट प्रकाशाच्या सर्व स्रोतांपासून रक्षण करा[1]
- केसांना शैली देणाऱ्या उत्पादनांचा (जसे केसांचा रंग, डाय्ज, ब्लिचिंग, हॉट रोलर्स) सीमित वापर करा[3]
- गरम तेलाचे उपचार टाळा[1]
- तुमच्या केसांना हळुवारपणे ब्रश करा किंवा विंचरा[1]
- ओल्या केसांवर ब्रश फिरवणे टाळा[9]
- घट्ट केसांची शैली बनवणे, जसे ब्रेड्स, बन्स किंवा पोनीटेल्स टाळा[8]
- केस खेचणे टाळा[8]

## निकोप जीवनशैली राखा.

- आयर्न, प्रोटीन आणि बायोटिनने समृद्ध असा सकस आहार घ्या[8,10]
- स्वत:ला सजलीत ठेवा[10]
- धुम्रपान थांबवा[8]
- केस गळण्यासाठी कारणीभूत असणाऱ्या औषधे आणि पुरकांविषयी तुमच्या डॉक्टरांना विचारा.[1]
- चिंतन आणि योगाच्या अभ्यासाद्वारा तुमचा तणाव कमी करा.[10]
- त्वचारोगतज्ज्ञांना भेटण्यासाठी वेळ निश्चित करा.[8]


Reference:

1 Hair loss. Information available on: https://www.mayoclinic.org/diseases-conditions/hair-loss/symptomscauses/syc-20372926?p=1. Accessed on 14/06/2021.

2 Springer K, Brown M and Stulberg DL. Common hair loss disorders. Am Fam Physician. 2003;68(1):93-102.

3 Gardner SS. Understanding Hair Loss -- the Basics. Information available on: https://www.webmd.com/skinproblems-and-treatments/hair-loss/understanding-hair-loss-basics#2. Accessed on 14/06/2021.

4 Hair loss: WHO GETS AND CAUSES. Information available on: https://www.aad.org/public/diseases/hairloss/causes/18-causes. Accessed on 14/06/2021.

5 Hair loss. Information available on: https://www.mayoclinic.org/diseases-conditions/hair-loss/diagnosistreatment/drc-20372932. Accessed on 14/06/2021.

6 Hair loss in Women. Information available on: https://my.clevelandclinic.org/health/diseases/16921-hair-loss-inwomen. Accessed on 24/06/2021.

7 Tips For Healthy Hair. Information available on: https://www.aad.org/tips-healthy-hair. Accessed on 15/06/2021.

8 Information available on: https://www.aad.org/public/diseases/hair-loss/treatment/tips#tips. Accessed on 15/06/2021.

9 Information available on: https://www.aad.org/public/diseases/hair-loss/insider/stop-damage. Accessed on 15/06/2021.

10 Kumar K. 20 Effective Ways to Stop Hair Loss in Men. Information available on: https://www.medicinenet.com/20_ways_to_stop_hair_loss_in_men/article.htm. Accessed on 16/06/2021.



This communication is intended for public awareness purpose only and does not substitute advice of a Medical Practitioner. Please consult your doctor for any medical advice



GGI-CO-A2-DMA-300001252-300001252-LL-F21-543


Dr.Reddy's


**Dr. REDDY'S LABORATORIES LTD.,**
Customer Service Cell: Dr. Reddys Laboratories Ltd.,
GGI First Floor, 7-1-27, Ameerpet TS-500016.
Toll Free: 18004250014. Email: customerservices@drreddys.com